# प्रकरण तिसरे

# शेतकरी, व्यापारी,कामगार यांच्या हितसंवर्धनासाठी शेती उत्पन्न बाजार समितीचे कार्य

१) प्रास्ताविक
२) गूळ - शेंग विभाग
३) कांदा, बटाटा विभाग
४) फळे - भाजीपाला विभाग
५) धान्य विभाग
६) जनावरे बाजार
७) उपबाजार व इतर विभाग

## १. प्रास्ताविक :

भारतातील शेतीप्रधान व्यवस्थेमध्ये शेती उत्पादन वाढीबरोबरच शेतीमालाची विक्री व्यवस्था ही एक महत्वाची बाबआहे.. शेतीत उत्पादन करणारा शेतकरी, शेतमालाची विक्री करणार व्यापारी वर्ग तसेच शेती आणि व्यापार या दोन्हीमध्ये काम करणारे संघटीत व असंघटीत कामगार या घटकांच्या श्रमावर व प्रामाणिकपणावर बाजारपेठांचा विकास व ग्राहकांचे समाधान अवलंबून असते. अलिकडच्या काळात सिंचनाच्या सोयित वाढ झाल्यामुळे व नविन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेती उत्पादनात लक्षणिय वाढ झाली आहे. या उत्पादनवाढीबरोबरच वितरण व्यस्थचेचा विकास त्याप्रमाणात झालेला नाही. शेतीमालाच्या खरेदी-विक्री मधील दोष दूर करण्याचे काम बाजार समित्यांच्या सक्षमतेवर अवलंबून आहे.

शेती व्यवसायाच्या स्वरूपामध्ये अलीकडच्या काळात लक्षणीय बदल होत आहेत. शेती व्यवसाय हा उदरनिर्वाहाचे साधण न राहता अधिकाधिक बाजारभिमुख होत आहे. देशांतर्गत व विदेशी बाजारपेठा ह्या कृषी उत्पादनाचे स्वरूप ठरविण्यामध्ये फार मोठी भूमिका बजावत आहेत. सरकारी व इतर नियंत्रणाचे प्रमाण कमी होत असल्यामुळे भारतीय शेती उद्योग मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये फेकला जात आहे. साहजीकच याचा परिणाम शेती व्यवसायावर आधरित असलेल्या संबंधित घटकांवर होत आहे. भारतातील कृषी उत्पादनातील विविधतेचा लाभ कसा घ्यावयाचा हे आता आपल्यावर अवलंबून आहे. कृषि मालाच्या निर्यातीस अधिकाधिक प्राधान्य देऊन त्याचा फायदा करून घेण्यासाठी कृषी मालाच्या विपणनामध्ये गुंतलेल्या संस्थांनी या संधीचा फायदा उचलला पाहिजे. शेती व्यवसायाच्या प्रगतीमध्ये शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्यातील परस्पर सहकार्य व विश्वास या गोष्टी महत्वाच्या आहेत. सर्वच बाजारपेठांच्या विकासासाठी त्यांचे योगदान आवश्यक आहे. बाजार समित्यांनीही शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या विकासासाठी शासनाच्या सहाय्याने आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली पाहिजे.

कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासामध्ये अनेक सहकारी संस्थांचा सहभाग आहे. जिल्ह्यातील ऊसाची शेती, साखर कारखाने व गुळाची बाजारपेठ हा आर्थिक व्यवहाराचा पाया

आहे. ऊस उत्पादन कमी झाले अथवा योग्य भाव मिळाला नाही तर या शेती व्यवसायाचा परिणाम इतर सर्वच क्षेत्रावर होतो व जिल्ह्याचे आर्थिक जीवन चिंतेचे बनते. जिल्ह्यातील ऊस हे प्रमुख पिक असून कोल्हापूरच्या शेतकऱ्याने ऊस शेतीत लक्षणीय प्रगती केली आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक यांनी आपल्या भाषणातून कोल्हापूरच्या शेतकऱ्याचे सार्थ वर्णन केलेले आहे. "कोल्हापूरचा शेतकरी हा गतानुगतीक नाही, तसाच तो अडाणीही नाही आणि आळशी तर नाहीच नाही! देशाच्या कानाकोपऱ्यात आणि विशेषत: महाराष्ट्राच्या इंच इंच भूमिवर जिथे-जिथे हिरव्या क्रांतीची प्रसादचिन्हे मला पहायला मिळतात तेथे तेथे मला सर्वप्रथम आठवण येते ती कोल्हापूरच्या शेतकरी मित्रांची कारण केवढीही प्रतिकूलता असली तरी पाण्याचा थेंब न थेंब घामाचा समजून त्याचा हरितक्रांतीसाठी कसा उपयोग करून घ्यायचा याचे ज्ञान त्याच्या रक्तात भिनलेले आहे. जमीनीला तो अक्षरश: आपली माता मानतो व तितकीच ममता तो तिच्यावर करतो!"[१] कोल्हापूरच्या शेतकऱ्यांनी आपल्या श्रमाने येथील जमीन सुजलाम सुफलाम केली आहे. लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी येथील शेतकऱ्यास "भगिरथाने वंशज" असे गौरविले आहे. ते म्हणतात, "भगिरथाचे दीर्घकाळ तपश्चर्या करून स्वर्गातील गंगेला पृथ्वीतलावर आणले आणि आपल्या पूर्वजांचा उद्धार केला ही कथा झाली पुरातणातली! पण आजच्या या युगात शेकडो भगीरथ या एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात आहेत हे जर पहावयाचे झाले तर वारणेपासून कृष्णेपर्यंत आणि भोगावतीपासून पंचगंगेपर्यंत फेरफटका मारा त्या भगीरथाचे जिद्दीपुत्र ठायीठायी दिसतील."[२] अशाप्रकारे कोल्हापूरच्या शेतकऱ्याचा नेहमीच गौरव झाला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यास सुपीक व निचऱ्याची जमिन, पाटबंधारे प्रकल्प व बारमाही वाहणाऱ्या मोठ्या नद्या, पोषक हवामान व पाऊस यांची देणगी लाभली आहे. त्यात कष्टाळू शेतकरी आपल्या श्रमाने शेती चांगल्या पद्धतीने करतो आहे. सहकारी संस्था, पाणीपुरवठा संस्था यांच्या सहाय्याने शेतीच्या पाणी पुरवठ्याची व्यवस्था करून पठारापासून ते थेट डोंगरमाथ्यापर्यंत उसाची लागवड केली आहे. साखर उतारा व गुळाचे बाबतीत कोल्हापूर जिल्ह्याने नावलौकीक कमावला आहे. कोल्हापूरचा गूळ म्हणजे सोनेरी, पिवळा, रसाळ व टिकाऊ म्हणून प्रसिद्ध झाला आहे. येथील शेतकऱ्यांनी गूळ

बाजारपेठेच्या विकासात नेहमीच चांगले योगदान दिले आहे. कोल्हापूरची बाजार समिती व शेतकरी यांनी परस्पर सहकार्याने व विश्वासाने जिल्ह्याच्या शेतीच्या, पर्यायाने शेतकऱ्यांच्या विकासात महत्वाचा वाटा उचलला आहे.

कोल्हापूरच्या शेतीला, शेतकऱ्याला आणि आर्थिक विकासाला चालना व प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम बाजारपेठेतील व्यापारी वर्गानेही प्रामाणिकपणे केलेले दिसते. बाजारपेठेच्या विकासात त्यांनी मोठी मोलाची कामगिरी बजावलेली आहे. व्यापारी व शेतकरी यांचे कार्य, आजपर्यंतची वाटचाल ही एकमेकास अत्यंत पुरक अशी ठरली आहे. या दोन्ही घटकांनी गुण्यागोविंदाने व देवाण-घेवाणीच्या भावनेतून व सहाकर्याने प्रगीतीची घोडदौड केली आहे. राजर्षि शाहू महाराजांच्या उदार आश्रयाने व दूरदृष्टीने या बाजारपेठेची प्रगती झाली आहे. राजर्षि शाहू महाराजांनी बाहेरील व्यापाऱ्यांना बोलावून त्यांना सर्व सवलती देवून व्यापरास उत्तेजन दिले होते. त्यानंतर येथील व्यापारात सातत्याने वाढ होत गेली आहे. व येथील व्यापार सतत प्रगतीपथावर आहे. कोल्हापूरचे व्यापारी वैभव वाढविण्यात येथील व्यापारी व बाजार समिती यांनी संघटीतरित्या नेहमीच प्रयत्न केले आहेत. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती व व्यापारी यांनी शेतकरी व कामगार यांच्या संबंधामध्ये व उलाढालीत प्रमाणिकपणे प्रयत्न केले आहेत.

राजर्षि शाहू छत्रपतींनी अत्यंत दूरदृष्टीने बाजारपेठ वसविली. बाजारपेठ म्हटले की श्रमिक (कामगार) हा आलाच. हमाली कामासाठी हमाल, वजनमापासाठी तोलाईदार (मापाडी), पेठीवर काम करणेसाठी दिवानजी, वाहतुकीसाठी गाडीवान, व इतर वाहतूकदार तसेच महिला हमाल या सर्वांचा कामगारांमध्ये समावेश होतो. भांडवलाबरोबर श्रमासाठी तितकेच महत्व आहे याचाच अर्थ बाजारपेठेची व्यापारी व श्रमिक ही दोन चाके आहेत. पुर्वीच्या काळी श्रम करणाऱ्यास श्रमाचा मोबदला दिला जात असला तरी श्रमास प्रतिष्ठा नव्हती. त्यांच्यासाठी योग्य कायद्याची तरतूद नव्हती. मालकाच्या कृपादृष्टीवरच काम अवलंबून होते. त्याला हक्काची परिभाषा माहीत नव्हती, पण त्याकाळीही कर्तव्याची जाणीव प्रखरपणे होती. कामगार आपल्या सुखदु:खाचा विचार करून संघटीतपणे आपल्या विकासासाठी प्रयत्न करत आहेत. आपल्या कामाचा योग्य मोबदला

मिळविणेसाठी ते एकजुटीने प्रयत्न करतात येथील कामगार वर्गाच्या आदर्श वागणूकीने व प्रामाणिक काम करण्याच्या कष्टाळू वृत्तीमुळे कामगारवर्ग बाजारपेठेचे भूषण झाला आहे.

कोल्हापूर बाजारपेठेत कामगारवर्ग आपल्या मागण्यासाठी झगडत असतांना वर्ग विग्रहाच्या भ्रामक कल्पनेमुळे निर्माण होणारी कटूता येथे दिसत नाही. कामगारांचे प्रश्न निर्माण झाल्यानंतर येथील व्यापारी व बाजारसमिती तसेच नेतेमंडळी परस्पर विचारातून सर्वांच्या हिताचे योग्य निर्णय घेतात. कोल्हापूर बाजारपेठेचा पर्यायाने बाजार समितीचा सर्वांगिण विकास करणेसाठी शेतकरी, व्यापारी, कामगार, समितीचे संचालक मंडळ, कर्मचारी यांनी परस्पर सहकार्याने व सामंज्यस्याने प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. शेतकरी, व्यापारी व कामगार आणि बाजार समिती यांनी हातात हात घालून या बाजारपेठेस वैभव प्राप्त करून दिले आहे. शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या हितसंर्वधनासाठी शेती उत्पन्न बाजार समितीने मोलाचे कार्य केले आहे.

बाजार समितीने शेतीमालाच्या आवकेप्रमाणे व खरेदी विक्रीच्या सोयीनुरूप बाजार आवारात गूळ, शेग विभाग, कांदा  बटाटा विभाग, भाजीपाला विभाग, धान्य विभाग, जनावरे बाजार तसेच उपबाजार व इतर विभाग निर्माण केले आहेत. शेतीमालाच्या आवकेनुसार तेथे सर्वसुविधा व आवश्यक ती रचना केली आहे. शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्यासाठी योग्य ती सुविधा पुरविली आहे. बाजार समितीची सन. २००३-२००४ ची वार्षिक उलाढाल २,६२,४६,३०,९५६/- रूपये इतकी असून शेतमालाच्या नियमनाचे काम विभागनिहाय चालते.[३]

## २) गूळ-शेंग विभाग :

**तक्ता क्र. १**

**बाजार आवारातील आवक, व किंमत यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

बाजार वर्ष-२००३-०४

| तपशील | गूळ | शेंग | एकूण |
|---|---|---|---|
| जात/प्रत | -- | फुले प्रगती | |
| आवक (क्विंटल) | ६,२८,१२२ | ८६६ | ६२,९८,९८८ |
| विक्री (क्विंटल) | ६,२८,१२२ | ८६६ | ६,२८,९८८ |
| किंमत | ७०,६८,२५,४८५/- | १४,५४,५३२/- | ७०,८२,८०,०१७/- |
| बाजार फीचे दर | १.०० | १.०० | --- |
| प्रत्यक्ष वसुली रक्कम | | | २९,५६,२९८/- |
| सह.संस्था आवक (क्विंटल) | १,०४,६८६/- | | २९,६०१/- |
| सह.संस्था आवक किंमत | ११,७५,००,२९०/- | | ४,८९,२००/- |
| विक्री किंमत | ११,७५,००,२९०/- | | ४,८९,२००/- |

**संदर्भ :** संख्यिकी विभाग कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

वरील तक्त्यामध्ये बाजारवर्ष २००२-०३ ची गूळ व शेंग व शेतमालाची आवक व विक्री .

एकूण उलाढाल, बाजार फी चे दर, बाजार फी र्ची वसूली रक्कम, त्याप्रमाणे सह.संस्था मधील आवक, उलाढाल आवक व विक्री किंमत अशाप्रकारे एकत्रीतपणे नमूद केली आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती ही गुळाची बाजारपेठ म्हणून प्रसिध्द आहे. गुळ बाजार हा बाजारपेठेचा प्रमुख आधार आहे. या बाजारपेठेशी स्थानिकचा शेतकरी संबंधीत आहे. कोल्हापूर जिल्हा हा ऊस पिकासाठी प्रसिध्द आहे. सध्या कोल्हापूर जिल्ह्यात अंदाजे १२०० ते १५०० गुऱ्हाळघरे आहेत. गुळाचा हंगाम ऑक्टोबर ते मार्च पर्यंत चालतो. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात प्रामुख्याने करवीर तालुका गूळ उत्पादनासाठी प्रसिध्द असून त्याचबरोबर पन्हाळा, शाहूवाडी, राधानगरी, भुदरगड व कागल या परिसरामध्येही गुऱ्हाळघरे आहेत.

या व्यवसायामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ होतो. प्रत्येक गुऱ्हाळघरावर अंदाजे २५ ते ३० मजूरांना रोजगार उपलब्ध होतो. त्याप्रमाणे ऊस वाहतूक व गूळ वाहतूकीमध्येही

रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. या व्यवसायावर अंदाजे २५ ते ३० हजाराहून अधिक लोकांचा रोजगार अवलंबून आहे. येथील गूळ बाजारपेठेने शेतकऱ्याच्या आर्थिक विकासात मोलाची कामगिरी बजावली आहे.

कोल्हापूर बाजार समितीमध्ये बाजार वर्ष २००२-०३ मध्ये रूपये ७०,८२,८०,०१७ /- इतकी उलाढाल झाली आहे. त्यामध्ये या विभागास जोडून असलेल्या शेंग विभागाची उलाढाल रूपये १४,५४,५३२/- इतकी आहे. या बाजारपेठेत सर्वाधिक उलाढाल गूळाच्या व्यापारामध्ये होते. येथील गुळ अहमदाबाद, गुजरात, व देशाच्या विविध भागात तसेच परदेशातही निर्यात होतो. येथील गुळाच्या व्यापारास फार मोठी परंपरा आहे.शेतकरी, अडत दुकानदार व व्यापारी यांच्यामध्ये विश्वासाने आर्थिक व्यवहार होतो. या व्यवसायात सहकारी संस्थांचा सहभाग महत्वपूर्ण आहे.

कोल्हापूरच्या गूळ व्यापार वृध्दीसाठी राजर्षि शाहू महाराजांनी व्यापार पेठेची स्थापना करून शेतकरी व व्यापारी यांना प्रोत्साहन दिले आहे. बाजारसमिती ही त्याच विचाराने वाटचाल करत आहे. येथील शेतकऱ्याला आजही अडत दुकानदार ऊस पिकतारणावर त्याच्या गरजेनुरूप पैशाची ऊचल विश्वसाने देतात. गुळाच्या व्यापारासाठी बाजार समितीने भरपूर जागा उपलब्ध केली आहे. त्यामध्ये नियोजीत मोटे रस्ते, सुव्यस्थित गोदामे यांची रचना केली आहे. गूळाची विक्री उघड सौदा पध्दतीने केली जाते. गूळाची बाजारपेठेत आवक झालेनंतर प्रतवारीनूसार त्याची योग्य माडंणी केली जाते. गूळ सुरक्षित ठिकाणी नियमानुसार उतरला जातो. शेतकऱ्यास त्याच्या मालाची विक्री किंमत व वजनमापाची पट्टी योग्य वेळेत दिली जाते. समितीमार्फत परवानाधारक तोलाईदाराकडून चोख वजनमाप व गूळ उत्पादनासंबंधी चर्चासत्रे व मार्गदर्शन शिबिरे घेतली आहेत. गूळ विभागात शेतकऱ्यांना योग्य त्या सोयी पुरविल्या आहेत.

गुळाच्या बाजारपेठेत व्यापाराच्या दृष्टीने अडते (दलाल), खरेदीदार व्यापारी, व कमिशन एजंट अशा परवानाधारकांचा समावेश आहे.

अडत्या (दलाल) हे प्रामुख्याने शेतकऱ्यांचा आलेला माल हमालाकरवी योग्य ठिकाणी उतरून घेतात. गूळाची व्यवस्थीत मांडणी करणे, गूळाचे सौदे काढणे, विक्रीची पट्टी तयार करणे, व

शेतकऱ्यांना त्यांची बिलाची रक्कम आदा करणे इत्यादी काम करतात. खरेदीदार व्यापारी हे आपल्या व्यक्तीगत जबाबदारीवर गूळाची खरेदी करतात. वेगवेगळ्या अडत दुकानात खरेदी केलेला माल एकत्रित करून पाठवतात. कमिशन एजंट हे मागणीप्रमाणे माल खरेदी करून त्यात ठराविक कमिशन घेवून माल पाठवितात. बाजारसमितीने सर्व व्यापाऱ्यांना परवाने दिले असून व्यापाराच्या अनुषंगाने योग्य त्या सोयीसुविधा व संरक्षण दिले आहे.

गूळांच्या बाजारपेठेत हमाल, तोलाईदार व दिवानजी या कामगारांचे कामही महत्वपूर्ण आहे. पेठेवर अडत दुकानात गूळाची आवक आलेनंतर हमाल माल योग्य पध्दतीने व रंगानुसार त्याची योग्य मांडणी करतात. हमालांचे हे काम कौशल्याचे आहे. गूळाचा सौदा झालेनंतर तोलाईदार त्याचे चोख वजनमाप करतात. गूळाचे पॅकींग व भरणी हे काम हमालामार्फत केले जाते. अडत दुकानामध्ये दिवानजी मालाची आवक नोंदवितात. सौदा काढणेस मदत करणे, विक्रीनुसार पट्टी करणे, मालाची किंमत अदा करणे व जावक पाहणे हे कामही दिवानजी मार्फत केले जाते. बाजारसमितीने कामागारांसाठी सोयीसुविधा केल्या आहेत. मजूर विश्रांतीगृह बांधले आहे. संबंधीत कामगारांना त्यांचे अडत दुकानामध्ये रहाण्याची व्यवस्था केली आहे. कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला बाजार समितीने ठरवून दिला आहे. गुळाची एकूण उलाढाल पहाता कामगारांना चांगले उत्पन्न येथे प्राप्त होते.

बाजारसमितीतील कर्मचाऱ्यांमार्फत बाजारव्यवहारावर योग्य नियंत्रण ठेवले जाते. बाजारसमिती नियमानुसार गुळाचे सौदे काढते. त्यामुळे कोणत्याही घटकांवर अन्याय होत नाही. या व्यवसायात गूळ वाहतूकदारांनाही रोजगार उपलब्ध झाला आहे. शेतकरी व सर्वसंबंधीत घटकांच्या विकासासाठी येथील गूळ बाजारास निर्यातक्षेत्र म्हणून घोषित करणे व शासनामार्फत योग्य त्या सुविधा देणे आवश्यक आहे.

## ३) कांदा बटाटा विभाग :

तक्ता क्र. २

बाजार आवारातील आवक, विक्री व किंमत या संबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता

बाजार वर्ष २००२-०३

| अ. नं. | नियमन खालील वस्तूंचे नांव | आवक (क्विंटल) | विक्री (क्विंटल) | किंमत | बाजार फीचे दर | प्रत्यक्ष वसूलीचे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कांदा | ९,३१,४८९ | ९,३१,४८९ | २५,८७,७०,०६०/- | १.०० | |
| २. | बटाटा | २,६१,०८४ | २,६१,०८४ | १२,०२,३७,३५०/- | १.०० | |
| ३. | लसून | १२,०१,२४८ | १२,०१,२४८ | ३९,४८,२५,०६०/- | | ५०,१०,८१६ |
| | एकूण | १२,०१,२४८ | १२,०१,२४८ | ३९,४८,२५,०६०/- | | ५०,१०,८१६ |

**संदर्भ :** सांख्यिकी विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

वरील तक्त्यामध्ये बाजार आवारातील कांदा बटाटा विभागाची कादां-बटाटा व लसून या शेतमालाची आवक, विक्री, व उलाढाल किंमत, तसेच बाजार फी वसूलीची रक्कम यांची सन २००२-०३ मधील वार्षिक माहिती दर्शविली आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा बटाटा व लसून या शेतीमालाचे स्वतंत्र विभागात सुव्यवस्थीत कार्य चालू आहे. या बाजारपेठेत स्थानिकच्या माल फारसा नसूनही येथील उलाढाल मोठी आहे.. येथे कांद्याची आवक सोलापूर, सातारा, पुणे, श्रीगोंदा, नगर, बार्शी, कर्डूवाडी, सांगोला, पुसेगांव, फलटण, जेजुरी, माण, सासवड, म्हसवड, दहीवडी, लोणंद, पाटण या परिसरातून प्रामुख्याने होते. त्याप्रमाणे बटाट्याची आवक इंदौर, बेळगाव, आग्रा,. हसन, पुसेसावळी, कराड, जाखनगाव तालुका माण इत्यादी ठीकानाहून प्रामुख्याने होते.

साधारणपणे येथील बाजारात रोज २० ट्रक मालाची आवक होते. एक ट्रकमध्ये २०० पिशवी इतका माल असतो. शेतकरी एकत्रितपणे आपला माल ट्रकातून आणतात. अंदाजे दररोज बाजारात शेतीमाल घेवून येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १५० ते २०० इतकी आहे. बाजार समितीच्या बाजार वर्ष २००२-०३ मधील कांदा बटाटा व लसून यांची एकूण उलाढाल रूपये ३९,४८,२५,०६०/-

इतकी आहे. स्थानिक कार्यक्षेत्रात या शेतीमालाचे उत्पादन फारसे नसतानाही वरील उलाढाल पहाता बाजारपेठेने बाहेरील शेतकरी वर्गाचा विश्वास संपादन केला आहे. बाजारसमितीने केलेल्या सोयीसुविधा व योग्य व्यवस्थेमुळे या बाजारपेठेची प्रगती झाली आहे.

बाजारसमितीने शेतकऱ्यांच्या हिताची उघड सौदा पध्दत येथे प्रामणिकपणे राबविली आहे. मालाचे चोख वजनमाप अनुज्ञप्ती धारक तोलाईदार यांचे मार्फत केले जाते. मालाची विक्री होताच ताबडतोब मालाची रक्कम आदा केली जाते. शेतकऱ्यांना राहण्यासाठी निवासाची योग्य सोय केली आहे. या बाजारविभागात पक्के रस्ते, गोदामे, पाणी, लाईट, स्वच्छतागृहे, यांची व्यवस्था केली आहे. या सर्व सोयीसुविधामुळे येथील बाजारपेठेवर शेतकऱ्यांचा विश्वास वाढला आहे. बाजारसमितीच्या कांदा-बटाटा विभागामध्ये अनुज्ञप्ती धारक अडते-४५ व व्यापारी -६५ आहेत.[४] बाजार समितीने व्यापाऱ्यांना योग्य ती सुरक्षितता दिली आहे. व्यापाऱ्यांसाठी पुरेशी सिंमेटचे व डांबरी पक्के रस्ते व इतर अनुषंगिक सोयीसुविधा दिल्या आहेत.

कांदा बटाटा विभागामध्ये काम करणारे अनुज्ञप्ती धारक हमाल १५२, मदतनिस ५४ आहेत.[५] येथील कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला बाजार समितीने ठरवून दिला आहे. त्यांच्यासाठी मजूर विश्रांती गृहाची सुविधा बाजारसमितीने केली आहे. बाजारपेठेत मापाडी, हमाल इतर असंघटीत कामगार (रोजगार आणि कल्याण) कायदा, १९६९ लागू केला आहे.[६]

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या कांदा-बटाटा विभागात सर्व प्रकारच्या सुविधा बाजार समितीने दिल्या आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या मालास संरक्षण, बंदीस्त बाजार आवार व सुरक्षा व्यवस्था यामुळे बाजारपेठ सुरक्षित झाली आहे. येथे शेतकरी लांब पल्ल्यांवरून माल विक्रीस घेऊन येत असतो. गावी परततांना मालाची रक्कम त्याच्या सोबत असते. त्यामुळे त्यांना बाजार आवरातून एस.टी. बसेसची सुविधा होणे आवश्यक आहे. व्यापार वृध्दीच्या दृष्टीने कोल्हापूर येथे कांदा बटाटा या शेतमालाची निर्यात क्षेत्र व्हावे अशी सर्वांचीच मागणी आहे. येथील कांद्याची बाजारपेठ दिवसेंदिवस वाढत असून शेतकऱ्यांच कांदा साठवणूकीसाठी बाजार क्षेत्रात नाबार्ड बँकेच्या सहकार्याने कांदा चाळ उभारणी बाबतचा प्रस्ताव समितीच्या विचाराधीन आहे.

## ४) फळे-भाजीपाला विभाग :

### तक्ता क्र. ३

### बाजार आवारातील आवक, विक्री व किंमत या संबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता

बाजार वर्ष २००२-०३

| अ. नं. | नियमना खालील वस्तूंचे नांव | आवक (क्विंटल) | विक्री (क्विंटल) | किंमत | बाजार फीचे दर | प्रत्यक्ष वसूलीचे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | फळे | १४२१९३.०० | १४२१९३.०० | १८,८६,६७,६२५.०० | १.०० | |
| २. | भाजीपाला | ५३०८५७.०० | ५३०८५७.०० | २८,८८,९६,२१२.०० | १.०० | |
| | एकूण | ६७३०५०.०० | ६७३०५०.०० | ४७,७५,६३,८३७.०० | | ३९,९३,३५६.०० |

**संदर्भ :** सांख्यिकी विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

वरील तक्त्यामध्ये बाजार वर्ष २००२-०३ या सालाची फळे-भाजीपाला विभागाची आवक, विक्री व किंमत तसेच बाजार फी वसूलीचो रक्कम यांची माहिती एकत्रितपणे दिली आहे.

बाजारसमितीच्या मुख्य आवारात फळे-भाजीपाला विभाग स्वतंत्रपणे काम पहात आहे. त्यामध्ये फळे-भाजीपाला सौदा विभाग व बाजार फी वसूली विभाग असे दोन प्रशासकीय भाग केले आहेत. या बाजारपेठेत स्थानिकचा भाजोपाला व कर्नाटक राज्यातील भाजीपाल्याची आवक मोठी आहे. बाजारपेठेत फळे वेगवेगळ्या ठिकाणाहून विक्रीस येतात.

बाजारसमितीने फळे व भाजीपाल्यासाठी स्वतंत्रपणे अध्ययावत शेडची व्यवस्था केली आहे. त्यामध्ये व्यापाऱ्यांना गाळे दिले आहेत. या बाजारपेठत साधारणपणे स्थानिक कार्यक्षेत्रातून भाजीपाला येतो. त्यामध्ये शिरोळ तालुका, नांदणी परिसर, कागलच्या उत्तरेकडील-सागांव, पिंपळगाव परिसर, करवीर व हातकणंगले अशा विविध ठिकाणाहून शेतकरी भाजीपाला विक्रीसाठी येतात. कर्नाटक राज्यातून भाजीपाल्याची आवक येथे मोठ्याप्रमाणात होते.

बाजारपेठेत फळाची विक्री ज्या त्या शिजनप्रमाणे होते. त्यामध्ये प्रामुख्याने आंबा कोकण व कर्नाटकातून येतो. सांगलीमधून द्राक्षे, चिक्कू, जळगांवहून केळी, विजापूर-कवठेमहांकाळहून

लिंबू,पंढरपूर सांगोल्याहून बोरे व डाळींबे, पुणे, नगर, सांगली येथून बोरे त्याप्रमाणे दिल्लीहून सफरचंद, कर्नाटक व स्थानिक ठिकाणाहून कलिंगड, या फळांची आवक होते. भाजीपाल्यामध्ये कोबी, वांगी, टोमॅटो, ओली मिरची, ढबू मिरची, गवारी, घेवडा, ओला वाटाणा, फ्लॉवर, कोथिंबीर, पालेभाजी, दोडका, कारले, भेंडी, रताळी, मूळा, काकडी,वरणा, गाजर, पडवळ, दूधी भोपळा, हिरवा टोमॅटो, वालबिनीस, मक्का कणिस, आले, बिट, ओली शेंग, हरभरा पेंढ्या, पापडी, कैऱ्या, शेवगा शेंग, नवळकोल, यांचे बाजारसमितीने नियमन केले असून सन २००२-०३ मध्ये भाजीपाल्याची वार्षिक उलाढाल रूपये २८,८८,९६,२२२=०० इतकी आहे. त्याचप्रमाणे फळामध्ये मोसंबी, संत्री, लिंबू, चिक्कू, सफरचंद, डाळींब, द्राक्षे, बोरे, कलींगड, अजीर, रामफळ, अननस, सिताफळ, कवड, लालबाग, आंबा, हापूस आंबा, तोतापूरी आंबा, पायरी, पेरू, पपयी, आंबा रायवळ या फळांचे नियमन केले असून सन २००२-०३ ची फळबाजारातील वार्षिक उलाढाल रूपये १८,८६,६७,६२५=०० इतकी झाली आहे.

बाजारसमितीने शेतकरी, व्यापारी व कामगारांना योग्य त्या सोयीसुविधा या बाजारात पुरविल्या आहेत. फळे, भाजीपाला सौद्याचे काम सकाळी सहा ते दुपारी एक वाजेपर्यंत चालते. बाजार समितीने शेतकऱ्यांच्या हिताची उघड सौदा पध्दत, चोख वजनमाप व्यवस्था केली आहेत. माल विक्रीनंतर मालाची रक्कम ताबडतोब आदा केली जाते. शेतकऱ्यांना निवासाची सोय, पाणी, स्वच्छतागृहे, यांची व्यवस्था केली आहे. बाजारात पक्के रस्ते, गोदामे यांची व्यवस्था केली आहे. या बाजारपेठेत भाजीपाला विभागामध्ये अडते, कमिशन एजंट, खरेदीदार हे व्यापारी आहेत. बाजार समित्यांने व्यापाऱ्यांना व्यापारासाठी गाळे दिले आहेत. त्याचप्रमाणे फळे भाजीपाला विभागात सुसज्ज शेडची व्यवस्था केली आहे. व्यापाऱ्यांना परवाना दिलेला असून त्यांना इतर अनुषंगिक सुविधा दिल्या आहेत. व्यापाऱ्यांनी आपली फळे भाजीपाला व्यापारी असोसिएशन ही संघटना स्थापन केली आहे.

भाजीपाला विभागामध्ये कामगारांना बाजारसमितीने रितसर परवाना दिला असून त्यांचे योग्य ते वेतन समितीने ठरवून दिले आहे. त्यांच्यासाठी मजूर विश्रांतीगृह व इतर सुविधा पुरविल्या आहेत.

कोल्हापूर शेतीउत्पन्न बाजार समितीच्या फळे भाजीपाला विभागामध्ये शेतीमालाच्या संरक्षणासाठी बाजार समितीने सुरक्षा व्यवस्था केली आहे. बाजारपेठेच्या वाढीच्या दृष्टीने येथे आंबा या फळाचे निर्यातक्षेत्र व्हावे अशी मागणी आहे. कोकणातील जवळची व मोठी बाजारपेठ येथे असल्याने ही मागणी रास्त आहे. फळे व भाजीपाला हा शेतीमाल नाशवंत असल्याने बाजारपेठेत आवक जास्त झाल्यास शेतीमालाची मागणी व दर कमी होतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते हे नुकसान थांबवण्यासाठी योग्य ती साठवणूक व्यवस्था, शितगृह, व प्रक्रिया करणारे लहान लहान प्रकल्प येथे होणे आवश्यक आहे. भाजीपाला व फळे या बाजारावर लहान लहान विक्रते रिक्षा व टेंपो, ट्रक वाहतूकदार, हॉटेल व्यवसायिक यांचा व्यवसाय रोजगाराच्या दृष्टीने महत्वपूर्ण झाला आहे.

## ५) धान्य विभाग :

तक्ता क्र. ४

दुय्यम बाजार आवार - लक्ष्मीपुरी, शाहूपुरी फरशी - धान्ये व कडधान्ये

बाजार आवारातील आवक, विक्री व किंमत या संबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता

बाजार वर्ष २००२-०३

| अ. नं. | नियमना खालील वस्तूंचे नांव | आवक (क्विंटल) | विक्री (क्विंटल) | किंमत | बाजार फीचे दर | प्रत्यक्ष वसूलीचे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भात | १९५४५.०० | १९५४५.०० | ९७,१३,९००.०० | १.०० | |
| २. | तांदूळ | १८७५५२.०० | १८७५५२.०० | १८,७५,५२,०००.०० | १.०० | |
| ३. | ज्वारी | १७९६८३.०० | १७९६८३.०० | १५,२९,०६,८५०.०० | १.०० | |
| ४. | बाजरी | ११११७.०० | ११११७.०० | ७३,६०,४२५.०० | १.०० | |
| ५. | गहू | ८९९५७.०० | ८९९५७.०० | ९,९८,२१,०७५.०० | १.०० | |
| ६. | हरभरा | १२९२५.०० | १२९२५.०० | २,२४,६२,२५०.०० | १.०० | |
| ७. | मूग | १७७०७.०० | १७७०७.०० | ४,१५,१०,७००.०० | १.०० | |
| ८. | मसूर | १८९८९.०० | १८९८९.०० | ३,९१,९४,४२५.०० | १.०० | |
| ९. | मक्का | १३९८९.०० | १३९८९.०० | ७५,६६,१६०.०० | १.०० | |
| १०. | वाटाणा | ६३३३४.०० | ६३३३४.०० | ८,७९,४४,२५०.०० | १.०० | |
| ११. | चवळी | १९१३९.०० | १९१३९.०० | ४,२९,२०,५५०.०० | १.०० | |
| १२. | धने | १६५१३.०० | १६५१३.०० | ५,९६,४०,६५०.०० | १.०० | |
| १३. | मिरची | ४६३८५.०० | ४६३८५.०० | २२,५६,२७,०००.०० | १.०० | |
| १४. | मटकी | २६०४३.०० | २६०४३.०० | ७,४२,९१,०७५.०० | १.०० | |
| | एकूण | ७२२८७८.०० | ७२२८७८.०० | १,०५,८५,५१,३१०.०० | -- | ६१,९३,३५६.०० |

**स्वस्त धान्य दुकान :**

| अ. नं. | नियमना खालील वस्तूंचे नांव | आवक (क्विंटल) | विक्री (क्विंटल) | किंमत | बाजार फीचे दर | प्रत्यक्ष वसूलीचे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गहू | १९६३६०.०० | १९६३६०.०० | | १.०० | |
| २. | तांदूळ | १३७०७१.०० | १३७०७१.०० | | १.०० | |
| | एकूण | ३३३४३१.०० | ३३३४३१.०० | १३८८७९२००.०० | -- | १०१५२७३.०० |
| फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया ऑफिस, पुणे | | | | | | १७८६२५४.०० |

**संदर्भ :** सांख्यिकी विभाग; कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

वरील तक्त्यामध्ये धान्ये व कडधांन्ये तसेच स्वस्त धान्य दुकान यातील नियमनाखालील वस्तूंची आवक, विक्री, उलाढाल किंमत,बाजार फी वसूली रक्कम यांची सन २००२-०३ या सालाची संबंधीत माहिती दर्शविली आहे. त्याचप्रमाणे फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया ऑफिस, पुणे यांचेकडून मिळणारी बाजार फी ची रक्कम नमूद केली आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमध्ये धान्य व कडधान्य यांचा बाजार, समितीच्या नियंत्रणाखाली समितीच्या दुय्यम बाजार आवार- लक्ष्मीपूरी, शाहुपूरी फरशी येथे भरतो. त्यामध्ये धांन्ये व कडधांन्ये विभाग तसेच स्वस्त धान्य दुकान विभाग असे दोन प्रशासकीय भाग केले आहेत. धांन्ये व कडधांन्ये यामध्ये भात, तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, मूग, मसूर, मक्का, वाटाणा, चवळी, धने, मिर्ची,व मटकी यांचा समावेश होतो. स्वस्त विक्री दुकानात शासकीय यंत्रणेमार्फत गहू व तांदूळ यांची विक्री होते. त्याचे नियमन बाजार समितीमार्फत केले जाते. त्याचप्रमाणे फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया ऑफिस, पुणे यांचेकडूनही आपल्या व्यवहारानुसार बाजारसमितीस बाजारफीची रक्कम मिळते.

बाजार आवारात धांन्ये व कडधान्ये यांची सन २००२-०३ सालाची एकूण वार्षिक उलाढाल रूपये १०५,८५,५१,३१०/- इतकी झाली आहे. स्वस्त धांन्य दुकान विभागात वार्षिक उलाढाल

रूपये १३,८८,७९,२००/-इतकी झाली आहे. गहू पंजाब, उत्तरप्रदेश, या राज्यातून येतो. ज्वारी-बार्शी, धूळे, जालना, जळगांव, त्याचप्रमाणे मिरची मांडूर येथून, कडधांन्ये कर्नाटक, गुजरात, व आंध्रप्रदेश, डाळी लातूर, बार्शी, जळगांव येथून आवक होते. धान्य बाजार विभागात अडते- १२०, व्यापारी-१७६, परवानाधारक असून हमाल-९२, तोलाईदार-४१ व मदतनीस-९३ असे परवानाधारक कामगार आहेत.[७] सध्या कोल्हापूर शहरामध्ये धांन्य बाजार लक्ष्मीपूरी व शाहुपूरी विभागात विखूरलेला असून शहरी भागामूळे समितीस योग्य त्या सुविधा देणे अडचणीचे ठरले आहे. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीने शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या हितासाठी तसेच बाजाराच्या वाढीसाठी कोल्हापूर शहरालगत व पुणे- बेंगलोर महामार्गाशेजारी अद्यायावत असे धान्य मार्केट प्रकल्पाचे काम समिती मालकीच्या टेंबलाईवाडी येथील उपबाजारामध्ये सुरू केले आहे. हा प्रकल्प अद्यायावत पध्दतीने उभारण्यात येणार असून त्याचा अंदाजे खर्च रूपये ३० कोटी इतका आहे. धान्य बाजारासाठी ८.१५ हेक्टर जागा समिती मालकीची असून त्याठिकाणी प्राथमिक सुविधा करण्याचे काम चालू आहे.[८] सदर मार्केटमधील सर्व कामकाज संगणकीकृत करणेचा समितीचा मानस आहे. या बाजाराच्या उभारणीनंतर बाजार बंदीस्त व सुरक्षित तसेच एकत्रित व सर्वसुविधायुक्त होणार आहे. तेथे शेतकऱ्यांना शेतकरी निवास व इतर सुविधा उपलब्ध होणार आहेत. नवीन बाजाराच्या उभारणीनंतर बाजारपेठेला चालना मिळणार असून उलाढालीत वाढ होणार आहे. एकंदरीत धान्य बाजाराच्या उभारणीने शेतकऱ्यांची गैरसोय दूर होणार असून व्यापाऱ्यांच्या व्यापारात वाढ होणार आहे. धान्य बाजाराच्या अद्यायावत उभारणीमुळे बाजारसमितीचा व बाजारपेठेच्या लौकीकात भर पडणार आहे.

## ६) जनावरे बाजार : तक्ता क्र. ५

### जनावरांची आवक, विक्री बाबतची माहिती बाजार वर्ष २००२-०३

| मुख्य दुय्यम बाजाराचे नांवे | जनावरांचे प्रकार | आवक (नगात) | विक्री (नगात) | विक्री किंमत (रुपयात) | जनावरे विकणारी मालधनीची संख्या | बाजार फी चा दर | प्रत्यक्ष वसुलीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री. शाहू मार्केट यार्ड कोल्हापूर जनावरे बाजार | १.म्हैस | १७२१८ | ११६४९ | २९४४५१०० | १३२१५ | | २९४४५१.०० |
| | २. बैल | ५०१४ | ११८५ | | | | |
| | ३.गाय | १२०५ | २३ | | | | |
| | ४.रेडा | ९४७९ | ६७५१ | | | शेकडा १ | |
| | १.बकरी | १४३१९ | ९१०४ | ८९१९१५० | ९५४७ | रुपया | ८९१९१.५० |
| | २.शेळ्या | ६०६५ | २२०८ | | | | |
| | ३.मेंढ्या | ३९६३ | ११८४ | | | | |
| मलकापूर दुय्यम बाजार | १.म्हैस | ९९१ | ३८८ | ३९६८६०० | ११५७ | | ३९६८६.०० |
| | २. बैल | २३७० | ७८१ | | | | |
| | ३.गाय | १३९ | ५९ | | | | |
| | ४.रेडा | ६४४ | २७२ | | | शेकडा १ | |
| | १.बकरी | २३०९ | ७९५ | ८१६७७० | १०२३ | रुपया | ८१६७.७० |
| | २.शेळ्या | १३०६ | ५५३ | | | | |
| | ३.मेंढ्या | ४७६ | ९४ | | | | |
| एकूण जनावरे | १.म्हैस | १८२०९ | १२०३७ | ३३४१३७०० | १४३७२ | | ३३४१३७.०० |
| | २. बैल | ७३८४ | १९६६ | | | | |
| | ३.गाय | १३४४ | १५२ | | | | |
| | ४.रेडा | १०१२३ | ७०२३ | | | | |
| | एकूण | ३७०६० | २११७८ | | | शेकडा १ | |
| | १.बकरी | १६६२८ | ९८९९ | ९७३५९२० | १०५७० | रुपया | ९७३५९.२० |
| | २.शेळ्या | ७३७१ | २७६१ | | | | |
| | ३.मेंढ्या | ४४३९ | १२७८ | | | | |
| | एकूण | २८४३८ | १३९३८ | | | | |
| एकूण | | ६५४९८ | ३५१०६ | ४३१४९६२० | २४९४२ | | ४३१४९६.२० |

संदर्भ : सांख्यिकी विभाग कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती कोल्हापूर .

वरील तक्त्यामध्ये मुख्य बाजार आवार व मलकापूर दुय्यम बाजार आवार येथील बाजारवर्ष २००२-०३ ची जनावरांची प्रकार निहाय आवक व विक्रीची एकूण किंमत, जनावरे विकणाऱ्या मालकांची संख्या व प्रत्यक्ष बाजार फी वसूलीची रक्कम एकत्रीतपणे नमुद केली आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमध्ये आठवड्यातील दर रविवारी जनावरे बाजार भरतो. जनावरे बाजारामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील तसेच सांगली व महाराष्ट्र, कर्नाटक सीमाभागातील जनावरे विक्रीस येतात. बाजारसाठीचा मलकापूर दुय्यम बाजार येथेही जनावरे बाजार भरतो. बाजारवर्ष २००२-०३ मध्ये जनावरांची विक्रीची वार्षिक उलाढाल रूपये ४,३१,४९,६२०/- इतकी आहे. येथील बाजारात शेतकरी बाजारसमित्याच्या नियंत्रणाखाली जनावरांची खरेदी विक्री करतात त्याचप्रमाणे परवानाधारक दलालही आहेत.

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी जनावरे बाजारमध्ये आवश्यक सोयीसुविधा बाजारसमितीने पुरविल्या आहेत. बाजारासाठी बाजारपेठेतच स्वतंत्र जागेमध्ये बाजार विकसित केला आहे. जनावारांना सावलीसाठी शेडची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, धुण्यासाठी हौद बांधलेला आहे. जनावारांना बांधणेसाठी दगडी खुंटे नियोजनबध्द बसविले आहेत.बाजारात सावलीसाठी झाडे लावली आहेत. बाजारात ये-जा करणेसाठी एकच मार्ग असलेने बाजार सुरक्षित आहे.

शेतकऱ्यांसाठी हा जनावरे बाजार सोयीचा आहे. जनावरे, टेंपो व ट्रकमध्ये भरणेसाठी योग्य कठड्याची व्यवस्था केली आहे. बाजार समितीमार्फत जनावरे खरेदी विक्रीची नोंद असलेली पावती दोन्ही बाजूला दिली जाते व त्याची एक प्रत बाजारसमितीत राहते. या बाजारामुळे ट्रक व टेंपो वाहतूकदार हॉटेल व्यवसायिक यांना व्यवसाय मिळाला आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचा जनावरे बाजार सर्वांच्या दृष्टीने सुव्यवस्थीत आहे. येथील खरेदी-विक्री व्यवहारात साक्षांकन फी जनावारास नगास १ रूपये इतकी घेतली जाते. सांक्षाकन व बाजार पावती मुळे खरेदी विक्रीत विश्वास निर्माण झाला आहे. बाजारव्यवस्थेमुळे चोरीच्या जनावर विक्रीस प्रतिबंध होतो व योग्य असा व्यवहार येथे होत आहे.

## ७) उपबाजार व इतर बाजार :

### अ) मलकापूर उपबाजार :

तक्ता क्र. ६

मलकापूर दुय्यम बाजार आवार

बाजार आवारातील आवक, विक्री व किंमत या संबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता

बाजार वर्ष २००२-०३

| अ. नं. | नियमना खालील वस्तूंचे नांव | आवक (क्विंटल) | विक्री (क्विंटल) | किंमत | बाजार फीचे दर | प्रत्यक्ष वसूलीचे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गुळ | २५४.०० | २५४.०० | २,५०,९००.०० | १.०० | |
| २. | धान्ये | | | १२,८१,१५१.०० | १.०० | |
| ३. | कांदा | १३२९.०० | १३२९.०० | ४,६२,५५०.०० | १.०० | |
| ४. | भाजीपाला | ५०१०.०० | ५०१०.०० | २८,६७,२१०.०० | १.०० | |
| | एकूण | ६५९३.०० | ६५९३.०० | ४८,६१,८११.०० | | ४८,६१८.०० |

**संदर्भ :** सांख्यिकी विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

वरील तक्त्यामध्ये मलकापूर दुय्यम बाजार आवारातील सन २००२-०३ ची आवक, विक्री व किंमत यासंबंधीची माहिती नमूद केली आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचा मलकापूर तालुका शाहूवाडी येथे उपबाजार आहे. तेथे स्वमालकीची २.५६ हेक्टर जागा आहे.[१०] बाजारआवारात गूळ, धान्य, कांदा भाजीपाला या शेतीमालाची खरेदी-विक्री होते. सन २००२-०३ ची वार्षिक उलाढाल रूपये ४८,६१,८११=०० इतकी झाली आहे. बाजार आवारावर बाजारसमितीने स्वमालकीचे ऑफीस इमारत बांधली असून, पिण्याचे पाणी, जनावारांना शेड, तारेचे कंपाऊंड व इतर सुविधा पुरविल्या आहेत.

### ब) कागल उपबाजार :

बाजार समितीचा कागल या शहरात उपबाजार आहे. तेथे समितीची स्वमालकीची ५.४८ हेक्टर जागा आहे.[११] बाजार आवारास तरेचे कंपाऊंड, प्रवेशद्वार, ऑफीस इमारत, पिण्याचे पाणी, बागिचा, इत्यादी सुविधा समितीने केल्या आहेत. तेथे सध्या सहकारी संस्थांची कार्यालये, गोदामे, असनू इतर जागा रिकामी आहे. हा उपबाजार पुणे-बेंगलोर महामार्गास लागून आहे.

### क) फुले बाजार :

कोल्हापूर जिल्ह्यातील बरेच शेतकरी फुल शेतीकडे वळू लागले आहेत. त्यांच्या फुलास योग्य भाव मिळावा म्हणून या बाजार समितीकडून झेंडू, गुलाब, कार्नेशिअन, ग्लॅडीओलस व इतर सर्व प्रकारच्या फुलांच्या नियमनाची प्रक्रिया नुकतीच पूर्ण केली आहे. समितीमार्फत लवकरच नवीन फुले बाजार सुरू करणेत येणार आहे. यामुळे फूले उत्पादक शेतकरी व व्यापारी यांचा फायदा होणार असून व्यापारात संघटीतपणा येणार आहे.

### ड) वन उपज जळाऊ लाकूड :

### बांबू व चिवे (मेसकाठी बाजार) उपबाजार :

बाजारसमितीच्या कार्यक्षेत्रामध्ये खरेदी केलेल्या वन उपज जळाऊ लाकूड, बांबू व चिवे (मेसकाठी) यांचे नियमन शासनाने मार्केट कायद्यानुसार केलेले आहे. याची मार्केट फी खरेदीवर शेकडा रूपये एक व सुपरव्हिजन कॉस्ट रू. ०.०५ पैसे (पाच पैसे) याप्रमाणे आकारली जाते. शासनाचा आदेश व पर्यावरणाचे महत्व या दृष्टीने बाजार समितीने याच्या नियमांना सुरवात केली आहे. हे नियमन १५ मे १९९५ पासून सुरू झाले आहे.[१२] नियमन करतांना बाजारसमित्या स्वतः मालाची आवक नोंदवितात व खुल्या लिलावाने विक्री करतात. लिलाव झाल्यानंतर खरेदीदार मालाची व वजनाची व्यवस्था करतो. खरेदीदारास परवाना घ्यावा लागत नाही, कारण हे मार्केट 'ग्राहक मार्केट' म्हणून प्रसिध्द केले आहे. वनविभाग व बाजारसमिती हे परस्पर समन्वयाने काम करतात.

कोल्हापूर शेतीउत्पन्न बाजार समितीने या मार्केटसाठी शहरालगत कळंबा येथे जागा खरेदी केली आहे. तेथे योग्य त्या सोयीसुविधा पुरवण्यात येणार आहेत. या बाजारामुळे शेतकऱ्यांची फसवणूक थांबणार आहे व त्याच्या मालाला सुरक्षितता व योग्यभाव मिळणार आहे.

सध्या जळाऊ लाकूड, बांबू व चिवे (मेसकाठी) या बाजारात राधानगरी, शाहुवाडी, गगनबावडा, भुदरगड या कार्यक्षेत्रातून माल येतो. सध्या या बाजारात हमाली, तोलाई व अडत यांचे दर ठरलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. येथील माल पंढरपूर, लातूर, जळगांव इ. ठिकाणी जातो आहे. बैलगाडी व ट्रक धारकांना वाहतूकीचे काम उपलब्ध झाले आहे. या व्यवसायात श्रमाला योग्य मोबदला मिळणेसाठी बाजारसमितीच्या नियमनाची आवश्यकता आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे आजपर्यंतचे कामकाज व वाटचाल यांचा आढावा घेता समितीच्या मुख्य बाजार आवारात श्री शाहू मार्केट यार्ड येथे समितीने शेतकरी, व्यापारी व कामगार यांचेसाठी योग्य त्या सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत. नव्याने होत असलेल्या धान्य बाजार प्रकल्पामुळे धान्य बाजारांशी संबंधीत शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या बऱ्याचशा समस्यांची सोडवणूक होणार आहे. तसेच बाजारपेठेस चालना मिळणार आहे. बाजार समितीने मार्केट कायद्याच्या उद्देशाप्रमाणे शेतकरी हितासाठी अविरतपणे कार्य चालू ठेवले आहे. उघड सौदा पध्दत, चोख वजनमाप, शेतीमाल विक्रीची त्वरीत मिळणारी व योग्य प्रकारे विकसित केलेली विभागनिहाय गूळ, कांदा व भाजीपाला मार्केट यामुळे बाजार समितीने शेतकऱ्यांचा विश्वास प्राप्त केला आहे.

बाजारसमितीने श्री शाहू मार्केट यार्ड या प्रमुख बाजारपेठेमध्ये मध्यवर्ती ऑफीस इमारत, बगिचा यांची योग्य रचना व उभारणी केली आहे. शेतकऱ्यासाठी 'शेतकरी निवास' ही सर्व सोयीनियुक्त इमारत बांधली आहे. व्यापाऱ्यांसाठी व्यापाऱ्याला आवश्यक ते प्लॉट, गाळे दिले आहेत. त्यामध्ये कांदा गुदाम गाळे, तंबाखू गुदाम गाळे, फळे-भाजीपाला युनिट नं.१-५४ गाळे, युनिट नं.२-५१ गाळे व इतर गरजेनुरूप गाळे, स्टोअर इमारती, दुकान गाळे व साठवणूकीसाठी आवश्यक ती गुदामे यांचा समावेश होतो. व्यापार वृध्दीसाठी बाजार समिती नेहमीच सहकार्य करते. शासन पातळीवरील व इतर संबंधीत अडीअडचणी सोडविण्यासाठी बाजार समिती व लोकप्रतिनिधी

व्यापाऱ्यांना नेहमीच मदत करतात. बाजार समितीने कामगारांसाठी मजूर विश्रांतीगृह बांधले आहे. श्रमिकांच्या विविध अडचणी सोडविणेसाठी बाजार समिती प्रामाणिकपणे प्रयत्न करताना आढळते. बाजार आवारात पोस्ट ऑफीस, विविध बँकांची कार्यालये, चहापाण्यासाठी कॅन्टीनची व्यवस्था, या सुविधा निर्माण केल्या आहेत. बाजार आवारात सुरक्षेच्या दृष्टीने विभाग निर्माण केला असून पोलीस चौकी, वॉचमन चौकीच्या पाच इमारती, बंदिस्त बाजार आवार व प्रवेशद्वारे यांची रचना केली आहे. बाजारपेठेच्या विकासासाठी पक्के रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रसादन गृहे, व सुलभ शौचालये, पेट्रोलपंप यांची योग्य व्यवस्था केली आहे.

बाजार आवारात अद्ययावत असे श्री शाहू सांस्कृतिक मंदिर व कुस्ती आखाडा आहे. रेल्वे गुड्स स्टेशन, वजन काटा, विंधन विहीरी, जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा, रस्त्यावरील दिव्यांची सोय, उद्याने, सावली देणारी झाडे, शेतकरी शिल्प या इतर सुविधांद्वारे बाजारसमितीने बाजारपेठेचा विकास केला अहे. बाजारपेठेमध्ये योग्य ते नियोजन व रचना केल्यामुळे बाजार आवार व्यापारासाठी सुलभ झाला आहे. समितीने शेतकरी, व्यापारी व कामगार तसेच इतर सर्व संबंधीत घटकांशी विचार विनिमय करून आपले कार्य व्यवस्थित चालू ठेवले आहे. बाजारपेठेतील सर्व निर्णय सर्वांशी योग्य त्या चर्चेद्वारे घेतले जातात. त्यामुळे शेतकरी, व्यापारी व कामगार यांना या बाजारपेठेतबद्दल आस्था वाटते.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर. आपली वाटचाल करताना नेहमीच शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या विचारांचा आदर व सन्मान करते. सर्वांशी विचार विनिमय करुन योग्य ते निर्णय घेते. कोणत्याही घटकांवर अन्याय होणार नाही यादृष्टीने आपले कामकाज करत आहे. समितीची आजची वाटचाल व भावी योजना पाहाता समिती शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या हितसंवर्धनासाठी कार्य करत आहे.

## संदर्भ सूची


१) वसंतरावजी नाईक, मुख्यमंत्री - रौप्यमहोत्सव ग्रंथ, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, १९७०, पृष्ठ क्र. २०.

२) बाळासाहेब देसाई, रौप्यमहोत्सव ग्रंथ, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, १९७०, पृष्ठ क्र. ३३.

३) सांख्यिकी विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

४) अनुज्ञप्ती विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

५) तत्रैव.

६) सर्वसाधारण माहितीचा अहवाल , कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती,कोल्हापूर, पृ.क्र. ७.

७) अनुज्ञप्ती विभाग, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

८) बाजार समितीची संक्षिप्त माहिती, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, पृष्ठ क्र. ४.

९) सांख्यिकी विभाग, कोल्हापूर शेतो उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.

१०) सर्वसाधारण माहितीचा अहवाल , कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, पृ.क्र.३.

११) तत्रैव.

१२) विभाग प्रमुख, वन उपज जळाऊ लाकूड, बांबू व चिवे (मेसकाठी) बाजार, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार सनिती, कोल्हापूर.